मंत्री आस्थापनेवर निर्माण केलेल्या ३० जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या काल्पनिक पदांवरील नियुक्तीकरिता पात्रता निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : मावज २०१६/७०४/प्र.क्र. १८६ /३४-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ८ फेब्रुवारी, २०१८

<u>संदर्भः</u> सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक : एमआयएन १२१७/प्र.क्र.२४२ /२१, दिनांक - ३० डिसेंबर, २०१७.

प्रस्तावना:

वर्तमानपत्र/इलेक्ट्रॉनिक मिडीया व विविध प्रसारमाध्यमांद्वारे शासकीय योजनांना प्रसिध्दी, माध्यमांकडे खुलासा इ. कार्यवाही करण्यासाठी मंत्री आस्थापनेवर ३० जनसंपर्क अधिकाऱ्यांची काल्पनिक पदे प्रथमतः दोन वर्षाकरीता किंवा मंत्रीमंडळाचा कालावधी संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत मंत्री आस्थापनेवर निर्माण करण्यास संदर्भाधीन दिनांक ३० डिसेंबर,२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर काल्पनिक पदांवर ३० जनसंपर्क अधिकाऱ्यांची मंत्री आस्थापनेवर नियुक्तीकरिता निवड प्रक्रिया, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभवाची पात्रता, मंत्री आस्थापनेवर करावयाची कामे इ. कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

मंत्री आस्थापनेवर ३० जनसंपर्क अधिकाऱ्यांची काल्पनिक पदावर नियुक्ती करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.

२. जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय व इतर पात्रता असणे आवश्यक आहे -

१) उमेदवाराचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांकरिता वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम)
२) उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची पत्रकारिता विषयातील पदवी/संज्ञापन विषयातील पदवी/ समाज माध्यम विषयक क्षेत्रातील पदवी असावी.
३) उमेदवाराला मराठी, इंग्रजी, हिंदी या भाषांचे ज्ञान असावे.

पदवीनंतर उमेदवाराने दैनिकामधून किंवा नियतकालिकामधून किंवा समाजमाध्यम/ संज्ञापन या क्षेत्रात किमान ३ वर्षे पूर्णवेळ काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांचा प्राथम्याने विचार व्हावा.

३. उमेदवारांची पात्रता तपासणे व निवड प्रक्रिया ही खालीलप्रमाणे असेल -

१) शासन निर्णय, सा.प्र.वि.,क्र.एमआयएन-१२१४/प्र.क्र.२८८/२१, दि. १४.११.२०१४ सोबतच्या परिशिष्ट 'क' अन्वये मंत्री आस्थापनेवरील बाहेरील उमेदवारांच्या नियुक्तीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या पात्रताधारक योग्य उमेदवाराची शिफारस संबंधित मंत्री महोदयांकडून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास करण्यात येईल.
२) मा. मंत्री महोदयांनी शिफारस केलेल्या उमेदवाराची अर्हता प्रमाणित करुन महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचेमार्फत पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी सामान्य प्रशासन

विभाग/ कार्यासन २१ या कार्यासनाकडे सादर करण्यात येईल.

३) पात्र झालेल्या उमेदवारांची यादी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून प्राप्त झाल्यानंतर यादीतील उमेदवारांचे संबंधित मंत्री कार्यालयात नियुक्ती करण्याबाबतचे आदेश सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२१ मार्फत शासनाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येतील.

४) नियुक्त करण्यात आलेल्या जनसंपर्क अधिकाऱ्यांना प्रत्येकी दरमहा रुपये २५०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) इतके मानधन अनुज्ञेय राहील.

५) नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता व कोणतेही कारण न दाखविता कधीही संपुष्टात आणण्याचा अधिकार शासनास राहील.

६) सदर उमेदवारांना शासकीय/ निमशासकीय सेवेत सामावून घेण्याचा हक्क राहणार नाही.

४. मंत्री आस्थापनेवर नियुक्त केलेले जनसंपर्क अधिकारी हे संबंधित मा.मंत्री यांचे कार्यालयीन आस्थापनेवर मा. मंत्री महोदयांच्या निदेशानुसार कार्यरत राहतील. जनसंपर्क अधिकारी हे संबंधित मा.मंत्री, प्रशासकीय विभाग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यात दुवा म्हणून कार्य करतील. या अधिकाऱ्यांनी केलेल्या त्यांच्या कार्याचा अहवाल दरमहा संबंधित मंत्री महोदयांच्या विभागीय संपर्क अधिकाऱ्यांना सादर करावा.

५. सदर नियुक्ती दोन वर्षाकरीता असली तरी विभागीय संपर्क अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या मूल्यमापनाच्या आधारे या जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा घेऊन त्यांची नियुक्ती पुढे सुरु ठेवण्याबाबतची शिफारस माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दर ६ महिन्यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन २१ कडे करावी. शिफारस न करण्यात आलेल्या उमेदवारांच्या सेवा समाप्त करण्यात येतील व नवीन उमेदवाराची निवड वर नमूद केलेल्या पध्दतीनुसार करण्यात येईल.

६. मंत्री आस्थापनेवर जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या उमेदवारास खालील कामे करावी लागतील -

१) मा.मंत्री तसेच संबंधित विभागांचे सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिध्दीविषयक दैनंदिन कामकाज पार पाडणे.

२) मा.मंत्री यांचे विभागीय संपर्क अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार मा. मंत्री यांचेकडील बैठकांचे/जाहीर कार्यक्रमांचे वृत्तलेखन करणे.

३) मा. मंत्री यांच्या सार्वजनिक भाषणासाठी विभागाकडून माहिती घेऊन मुद्दे तयार करणे.

४) विभागीय संपर्क अधिकाऱ्यांच्या समन्वयाने मा. मंत्री/ सचिव यांच्या पत्रकार परिषदा तसेच वृत्तपत्रांसाठी, दूरचित्र वाहिन्यांसाठी मुलाखतीचे आयोजन करणे.

५) विभागाविषयी त्याचबरोबर मा.मंत्री/ सचिव यांचेविषयी विविध प्रसार माध्यमात आलेल्या बातम्यांची कात्रणे त्यांना दररोज अवलोकनार्थ सादर करणे, तसेच विविध प्रसार माध्यमात आलेल्या सकारात्मक व नकारात्मक बातम्यांबाबत खुलासा करणे व संबंधित प्रसारमाध्यमांकडे प्रसिध्दीला देणे.

६) संबंधित विभागाविषयी प्रसार माध्यमांमध्ये प्रसिध्द झालेल्या नकारात्मक मजकूराचा आढावा घेऊन विभागीय संपर्क अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार विभागाचा खुलासा तयार करणे आणि तो माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत संबंधित प्रसार माध्यमाकडे प्रसिध्दीला देणे, खुलासा प्रसिध्द होण्यासाठी संबंधितांकडे पाठपुरावा करणे व त्यानुसार मा. मंत्री/ सचिव यांना अवगत करणे.

७) संबंधित विभागाच्या योजनांच्या प्रसिध्दीबाबत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रसिध्दीविषयक विविध उपक्रम आखणे यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून वेळोवेळी मार्गदर्शन प्राप्त करणे.

८) प्रसार माध्यमांमध्ये विभागाच्या योजनांची पुरेशी व योग्य प्रसिध्दी होईल याबाबत दक्षता घेणे.

९) विभागाच्या योजना आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील प्रसिध्दी सामुग्री सर्वसामान्य जनतेपर्यंत विविध मार्गातून पोहचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास सहाय्य करणे.

१०) महासंचालनालयाची विविध प्रसिध्दी सामुग्री - लोकराज्य, जाहिरात फलक, लघुपट, महान्यूज वेबसाईट, घडीपुस्तिका आदी. यांकरिता विभागाच्या वतीने मजकूर तयार करुन देण्यासाठी सहाय्य करणे.

११) मा. मंत्री महोदय सोपवतील ती इतर कामे करणे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०८१३१८०८८००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.02.08 13:24:55 +05'30'

(रा. ना. मुसळे)
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
३) सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
४) प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सह सचिव, मुख्यसचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर.
८) संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९) खाजगी सचिव, सर्व मंत्री / राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
१०) सामान्य प्रशासन विभाग/का.२१, २५, ३४, ३९, मंत्रालय, मुंबई.
११) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई.
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१४) सामान्य प्रशासन विभाग/का.२१ (रोख), मंत्रालय, मुंबई.
१५) वित्त विभाग/व्यय-४, मंत्रालय, मुंबई.
१६) निवड नस्ती.